वाचले :

१) प्रशा/४/कावि/६११/२०१३ दि. ११/६/२०१३
२) मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषांगीक सुचना केंद्र यांचे कडील दि.१४/१०/२०१५
३) औद्योगीक प्रशिक्षण केंद्र मोरवाडी व साईशारदा महिला औद्योगीक प्रशिक्षण केंद्र कासारवाडी यांचेकडील प्राप्त पत्र
४) ६/०४/२०१६ चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.
माहिती व तंत्रज्ञान विभाग
मातंवि/१/कावि/231/२०१६
दिनांक - 07/4/2016

**विषय :- शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अंतर्गत महापालिका आस्थापनेवर शिकाऊ उमेदवारांची नेमणूक करणेबाबत ...**

**आदेश**,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अंतर्गत सन २०१५-२०१६ चे सत्राकरिता खालील उमेदवारांना त्यांचे नावासमोर नमुद केलेल्या व्यवसायाचे पदावर प्रशिक्षण कालावधीसाठी व विद्यावेतनावर शिकाऊ उमेदवार म्हणून नेमणुक देण्यात येत आहे.

| अ. क्र. | उमेदवाराचे नाव आणि पत्ता | ट्रेड/व्यवसाय | प्रशिक्षण कालावधी | विद्यावेतन दरमहा र.रु. | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | फुगे आश्लेषा गुलाब<br>गव्हाणे तालीम मागे मुजाबा मंदिरा समोर फुगे वाडा भोसरी<br>पुणे ३९ | पासा | १ वर्ष | ६१९२/- | खुला |
| २ | शेख सजनबी बाबूसाहब<br>हिराबाई झोपडपट्टी विकास नगर<br>कासारवाडी | पासा | १ वर्ष | ६१९२/ | खुला |
| ३ | बलकवडे गौरव अविनाश<br>विशालआंगण ए विंग फ्लाट न ३<br>पिंपरीगाव | पासा | १ वर्ष | ६१९२/ | खुला |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | यमगर वंदना जयाप्पा<br>पिंपळे गुरव जयभवानी नगर<br>पुणे ६१ | पासा | १ वर्ष | ६१९२/ | खुला |
| ५ | देडे प्रिती बिभिषण<br>रत्नदिप हौसिंग सोसायटी से.नं. २२ बि.नं. ३रू.नं.१०५ निगडी पुणे ३४ | पासा | १ वर्ष | ६१९२/ | खुला |
| ६ | शिंदे अश्विनी मारूती<br>वाल्हेकर वाडी, चिंचवडगाव<br>पुणे ३३ | पासा | १ वर्ष | ६१९२/ | खुला |
| 7 | चौहान अशोक रामध्यान<br>शिव कॉंलनी गणेश नगर थेरगाव<br>पुणे ३३ | पासा | १ वर्ष | ६१९२/ | खुला |
| 8 | म्हेत्रे विजय सौरप्पा<br>मोरवाडी पुणे | पासा | १ वर्ष | ६१९२/ | खुला |
| ९ | गायकवाड अनिकेत निवृती<br>रामनगर नवी सांगवी पुणे२७ | पासा | १ वर्ष | ६१९२/ | खुला |
| १० | गेंगजे चंद्रकला दशरथ<br>सृष्टी चौक पिपळे गुरव पुणे | पासा | १ वर्ष | ६१९२/ | अनु-<br>जाती. |
| ११ | सोनवणे कुणाल भास्कर<br>विठ्ठल नगर पिंपरी पुणे१८ | पासा | १ वर्ष | ६१९२/ | खुला |
| १२ | शेख रेषमा चॉंद<br>विकास नगर रेल्वे गेट जवळ कासार वाडी | पासा | १ वर्ष | ६१९२/ | खुला |
| १३ | जगदाळे कार्तिकी हेमंत<br>पिंपरीपुणे १८ | पासा | १ वर्ष | ६१९२/ | इमाव |
| १४ | वाबळे सोनल अशोक<br>सृष्टी चौक पिपळे गुरव पुणे | पासा | १ वर्ष | ६१९२/ | विमाप्र |
| १५ | राठोड रमेश तोळाराम<br>हकनवाडी (राठोड तांडा) सोमनाथपुर ता. उदगीर | पासा | १ वर्ष | ६१९२/ | विजा-अ |
| १६ | राऊत स्वप्नाली भिवाजी<br>सुदर्शन नगर पिंपळे गुरव पुणे६१ | पासा | १ वर्ष | ६१९२/ | खुला |
| १७ | साळवे वाल्मीकी भिमराव | पासा | १ वर्ष | ६१९२/ | अनु- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | १५प्रल्हाद नगर भुसावळ<br>जि. जळगाव | | | | जाती |
| १८ | वाणी विवेक सुरेश<br>लक्ष्मी नारायण नगर भुसावळ | पासा | १ वर्ष | ६१९२/ | इमाव |

वरील शिकाऊ उमेदवारांवर प्रशिक्षण कालावधीमध्ये खालील अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

१) वरील उमेदवारांना नि:संदिग्धपणे समज देण्यात येते की, त्यांची या आदेशान्वये करणेत आलेली नेमणुक ही पुर्णत: प्रशिक्षणार्थी म्हणून करण्यात आलेली आहे. प्रशिक्षणाचा विहित कालावधी पुर्ण होताच प्रशिक्षणार्थी म्हणून करण्यात आलेली ही नेमणुक आपोआप संपुष्टात येईल. त्यामुळे या उमेदवारांना महानगरपालिका आस्थापनेवरील कोणत्याही पदावर हक्क सांगता येणार नाही अथवा हक्क राहणार नाही.

२)सदरच्या नेमणुका या उमेदवारांनी दिलेल्या शैक्षणिक अर्हता व तांत्रिक पात्रता, पाहून दिलेल्या आहेत. त्यामध्ये व मुळ दाखल्यामध्ये काही तफावत आढळल्यास किंवा नियम अटीमध्ये बसत नसल्यास प्रशिक्षणार्थी म्हणून केलेली नेमणुक रद्द करण्यात येईल. व याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

३)नेमणुकीचे पदावर रुजू होताना उमेदवारांनी शैक्षणिक अर्हता व पात्रता, जातीविषयक व शाळा सोडल्याचा दाखला यांची मुळप्रत व त्यांच्या प्रत्येकी दोन प्रमाणित सत्यप्रत आणाव्यात.त्याशिवाय रुजू करुन घेतले जाणार नाही.

४)प्रशिक्षणार्थी रुजू होताना नव्याने काढलेल्या आपल्या छायाचित्राच्या पाच प्रती सोबत आणाव्यात व त्यापैकी दोन फोटो दोन स्वतंत्र कागदावर चिकटवून त्या फोटोवर ओळखणारे अधिकारी / पदाधिकारी यांची स्वाक्षरी घेऊन सादर करावेत. त्याशिवाय रुजू करुन घेतले जाणार नाही.

५)नेमणुक दिलेल्या उमेदवारांनी दिनांक १०/०४/२०१६ पुर्वी महानगरपालिकेच्या माहीती व तंत्रज्ञान विभागात रुजू व्हावे. या मुदतीत रुजू न झाल्यास कोणत्याही प्रकारचा पत्र व्यवहार न करता नेमणुक रद्द झाली आहे. असे समजण्यात यावे. तसेच औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, मोरवाडी व कासारवाडी पिं.चिं.मनपा यांचेकडून प्राप्त झालेले गुण व जात इ. तपशिल विचारात घेऊन नेमणुका दिल्या आहेत. त्या माहितीमध्ये तफावत असल्यास व प्रत्यक्षात जातीचा दाखला नसल्यास शिकाऊ उमेदवारास रुजु करुन घेतले जाणार नाही. अशा उमेदवारांची नेमणुक आपोआप संपुष्टात येईल असे समजण्यात यावे.

६)नेमणुक दिलेल्या शिकाऊ उमेदवारास नेमुन दिलेला प्रशिक्षण कालावधी पुर्ण करावा लागेल व शिकाऊ उमेदवार अधिनियमातील तरतुदीनुसार विहित नमुना शेड्युल-३ मध्ये (नियम क्र. १४) करारनामा करुन द्यावा लागेल. सदर करारनाम्याचा फॉर्म, हाऊस ऑफ फॉर्मस सॅन्डविक कंपनीसमोर, कासारवाडी किंवा औद्योगिक प्रशिक्षण संस्था बी.टी.आर.आय. विभाग, औंध, पुणे ७ येथुन उमेदवाराने स्वत: आणून त्याच्या तीन स्वतंत्रप्रती टंकलिखित करुन विहित नमुन्यातील फॉर्ममधील जागेवर साक्षीदारांच्या स्वाक्षरी घेऊन सादर करणे बंधनकारक राहिल. खाडाखोड केलेले अथवा अपुर्ण माहिती भरलेले फॉर्म स्विकारले जाणार नाहीत.

७)उमेदवार प्रशिक्षण कालावधीत विनापरवाना गैरहजर राहिल्यास किंवा गैरवर्तणुक आढळल्यास त्यास कोणत्याही प्रकारची पुर्वसुचना अगर नोटीस न देता केव्हाही प्रशिक्षणार्थी पदावरुन कमी केले जाईल व प्रशिक्षणार्थीचा शिकाऊ उमेदवार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणताही फायदा दिला जाणार नाही.

८)प्रशिक्षण कालावधीमध्ये उमेदवारांना नमुद केल्याप्रमाणे विद्यावेतन व शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६२ मधील नियम पोट कलम (अ) १ नुसार वर्षात १२ दिवस किरकोळ रजा, नियम ९ (ब) १ नुसार १५ दिवस वैद्यकीय रजा फक्त अनुज्ञेय राहतील. या व्यतिरिक्त अन्य फायदे अथवा सवलती अनुज्ञेय राहणार नाहीत,

९)प्रशिक्षण कामकाजाची वेळ ऑफिस स्टाफचे कार्यालयीन कामाचे वेळेनुसार राहिल व सर्व शासकीय सुट्ट्या देय राहतील. शिकाऊ उमेदवारांना अन्य पदाचे कामकाज देय राहणार नाही.

१०)शिकाऊ उमेदवारांची संविदा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पिंपरी चिंचवड पुणे – १९ येथे कोणत्याही कारणास्तव नोंदणी न झाल्यास सदरच्या उमेदवारांस त्वरीत कार्यमुक्त करण्यात येईल व कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

११) शिकाऊ उमेदवारांचे व्यावसायिक परिक्षेकामी आवश्यक असणारे सर्व कागदपत्रांची पुर्तता संबंधित उमेदवाराने स्वत: बी.टी.आर.आय. विभाग औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पिंपरी चिंचवड पुणे – १९ यांचेकडे संपर्क साधुन विभाग प्रमुखांमार्फत विहित मुदतीत करावी.

**१२)शिकाऊ उमेदवारांनी माहिती व तंत्रज्ञान विभागात रुजू होतेवेळी आय.टी.आय. कडील गुणपत्रिकेची मूळ प्रत जमा करावी लागेल, त्याशिवाय रूजू करुन घेतले जाणार नाही.**सदरची मूळ प्रत दिनांक २०/०५/२०१६ ते दिनांक ३०/०५/२०१६ या कालावधीत माहिती व तंत्रज्ञान विभागात स्वत: येऊन स्वाक्षरी पोहोच देऊन परत घेऊन जावीत. **सदर मुदतीत मूळ कागदपत्रे न नेल्यास त्यास माहिती व तंत्रज्ञान विभाग जबाबदार राहणार नाही.**

सही/-
सहाय्यक आयुक्त (प्रशासन)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रति -

सर्व संबंधित शिकाऊ उमेदवार

प्रत - १) लेखा विभाग २) मुलेप विभाग ३) संबंधित विभाग

२/- सदरच्या उमेदवारांना दरमहा ५ तारखे पुर्वी विद्यावेतन संबंधित विभागप्रमुखांनी अदा करावे आणि त्यांची मासिक हजेरी विचारात घेऊन उमेदवार गैरहजर राहिल्यावर आपले अधिकारामध्ये त्यांचेविरुध्द कारवाई करावी. तसेच शिकाऊ उमेदवारांना त्यांचे व्यवसायाचे सखोल प्रशिक्षण देणेकामी संबंधितांना सुचना द्याव्यात. उमेदवारांचे व्यावसायिक परिक्षेकामी आवश्यक असणारे सर्व कागदपत्रांची पुर्तता संबंधित उमेदवाराने औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पिंपरी चिंचवड पुणे – १९ यांचेकडे संपर्क साधून विहित मुदतीत करणेकामी आपलेमार्फत फॉर्म सही करुन द्यावेत.

४) मा. सहा. प्रशिक्षणार्थी सल्लागार (वरिष्ठ) मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सुचना केंद्र, द्वारा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पिंपरी चिंचवड, पुणे १९

५) मा. रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी, रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र ४८१, रास्तापेठ पुणे ४११ ०११.

६) मा. रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी, रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, रेल्वे उड्डान पुलाशेजारी, पिंपरी, पुणे ४११०१७.

७) मा. प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, मोरवाडी, पिंपरी १८.

मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी,
माहिती व तंत्रज्ञान विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८.